|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२४ दिनांक :- १५ मार्च, २०२४

---

जळगाव, दि. १५ (प्रतीनिधी) :- :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून विद्यापीठाच्या विज्ञान विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेतील प्रश्नांची उत्तरे मराठी भाषेतून लिहीण्यास अधिष्ठाता मंडळाने केलेल्या शिफारसीला कवयित्री बहिणाबाई उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

कुलगुरू प्रा. व्ही.एल.माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली दि. १५ मार्च रोजी विद्यापरिषदेची बैठक झाली. या बैठकीत विविध विषयांवर चर्चा झाली. अधिष्ठाता मंडळांनी केलेल्या विविध शिफारसींना बैठकीत मान्यता देण्यात आली. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानूसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून विज्ञान विद्या शाखेतंर्गत शिकवले जाणारे विषय मराठी भाषेतून देखील शिकवले जाणार आहेत.प्रश्नपत्रिका इंग्रजी भाषेतून असली तरी विद्यार्थ्यांना मराठी भाषेतून लिहिण्याची परवानगी दिली जाणार आहे. अधिष्ठाता मंडळाच्या या शिफारसीला विद्यापरिषदेने मान्यता दिली.

कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या कुलगुरू पदाच्या कारकिर्दीला २ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव प्राचार्य डॉ.अरविंद चौधरी यांनी मांडला. या ठरावाला प्राचार्य मनोहर पाटील यांनी अनुमोदन दिले. विद्यापीठाच्या शैक्षणिक विकासाला प्रा.माहेश्वरी यांच्या काळात गती मिळाल्याची भावना डॉ. चौधरी यांनी व्यक्त केली. कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी विद्यापरिषदेच्या या पुढच्या बैठकामध्ये एक तास चर्चेसाठी राखून ठेवला जाईल असे यावेळी सांगितले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

डॉ.सुनिल पाटील
जनसंपर्क अधिकारी